Tuljaram Chaturchand College Baramati 413102 * Pune *

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

## ( स्वायत्त महाविद्यालय )

नोटीस क्र. 323

दिनांक: ०७/१०/२०२३ - 6 OCT 2023

# NOTICE

## प्रथम वर्ष (PG) पदव्युत्तर बी.लिब. व एम.लिब. (NEP 2023 Pattern )अभ्यासक्रमामधील सर्व विद्यार्थ्यांसाठी ऑक्टो./ नोव्हें.- २०२३ ऑनलाईन परीक्षा अर्ज भरणेबाबत

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा फी परीपत्रक क्र. ३१२/२०१९ , २७/२०२३ व महाविद्यालयीन परीक्षा समितीच्या दि.१७/०७/२०२२ च्या निर्णयानुसार ऑक्टो./नोव्हें.- २०२३ ऑनलाईन परीक्षा अर्ज भरणेबाबत कार्यक्रम निर्धारीत केलेला आहे. तरी महाविद्यालयाच्या परीक्षा समितीने निर्धारीत केलेल्या तारखेपूर्वीच विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज व परीक्षा फी ऑनलाईन (www.tccollege.org) भरावी.

- ज्या विद्यार्थ्यांनी २०२३-२०२४ मध्ये पदव्युत्तर वर्गाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी सेमे.१ चा परीक्षा अर्ज ऑनलाईन भरावा. परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याअगोदर परमनंट रजिस्टर नंबर (PRN) ची नोंद विद्यार्थ्यांने स्वत:कडे करून घ्यावी.
- सर्व विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत ऑनलाईन परीक्षा अर्ज विना विलंबशुल्काने दि. १६/१०/२०२३ ते दि. २४/१०/२०२३ पर्यंत, विलंबशुल्काने दि. २५/१०/२०२३ ते दि. २८/१०/२०२३ पर्यंत भरावेत.
- जे विद्यार्थी या कालावधीत ऑनलाईन परीक्षा अर्ज भरू शकणार नाही त्यांचे विशेष विलंबशुल्काने दि. २९/१०/२०२३ ते दि. ३१/१०/२०२३ पर्यंत परीक्षा अर्ज स्विकारले जातील.
- ऑनलाईन परीक्षा अर्ज (Click here for Online Exam Form) भरताना परमनंट रजिस्टर नंबर (PRN) ओळख पत्रावरील अथवा ऑनलाईन प्रवेश घेतेवेळीची माहिती भरावी.
- परीक्षा अर्जामध्ये मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, ई-मेल, आयडी ABC आयडी इ. अचूक नमूद करावेत.
- प्रवेश घेतेवेळी जे विषय प्रवेश अर्जात नमूद केले होते तेच विषय ऑनलाईन प्रक्रियेतील परीक्षा अर्जामध्ये असणार आहेत व तेच विषय घ्यावे लागणार आहेत याची नोंद घ्यावी.
- ऑनलाईन परीक्षा अर्जातील माहिती भरल्यानंतर त्याचठिकाणी ऑनलाईन परीक्षा फी दिसेल व तेथेच (PAY FEE ONLINE ) भरण्याची लिंक असणार आहे. सदर लिंक मधून ऑनलाईन परीक्षा फी त्याचवेळी भरावी.
- ऑनलाईन परीक्षा फी भरल्यानंतर परीक्षा अर्ज डाउनलोड (DOWNLOAD EXAM FORM ) करून त्याची पाठपोठ (Back to Back) **प्रिंट काढून स्वत:कडे ठेवावी**. जर परीक्षा अर्जामध्ये काही त्रुटी असेल (उदा. नांव, जन्मदिनांक, पत्ता, ई-मेल, मोबाईलनंबर इ.) तरच **प्रशासनभवनामध्ये जमा करावेत**.
- प्रात्यक्षिक परीक्षा व थेअरी (लेखी) परीक्षासंबंधीचे स्वतंत्र वेळापत्रक महाविद्यालयातील सूचनाफलकावर व संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल.
- ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा अर्ज भरणेविषयी माहिती अथवा काही शंका असल्यास त्यांनी त्वरीत महाविद्यालयाच्या परीक्षा विभागाशी संपर्क साधावा.
- बॅकलॉग/रिपीटर ज्या विद्यार्थ्यांचा निकाल सर्टिफिकेट कोर्स पूर्ण न केलेमुळे अनुत्तीर्ण आलेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी सुद्धा ऑनलाईन परीक्षा अर्ज भरवा व आवश्यक तेवढे सर्टिफिकेट कोर्से पूर्ण करावेत.
- ऑनलाईन परीक्षा अर्ज भरण्याची सुविधा **ग्रंथालय विभागात नि:शुल्क** देण्यात येत आहे त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.



(P.T.O.)

# परीक्षा अर्ज भरण्याची मुदत

## प्रथम वर्ष एम.ए./एम.कॉम./ एम.एस्सी./
## एम.एस्सी. (कॉम्प्यु. सायन्स)/ बी.लिब. / एम.लिब./ एम.व्होक.

6 OCT 2023

## (NEP 2023 Pattern )

| विलंब शुल्काशिवाय परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत | विलंब शुल्क रू. १६५/- घेवून परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत | विशेष विलंब शुल्क रू. १,१६५/- घेवून परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत | प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होण्याची संभाव्य तारीख | लेखी परीक्षा सुरू होण्याची संभाव्य तारीख |
|---|---|---|---|---|
| दि. १६/१०/२०२३ ते दि. २४/१०/२०२३ | दि. २५/१०/२०२३ ते दि. २८/१०/२०२३ | दि. २९/१०/२०२३ ते दि. ३१/१०/२०२३ | दि.११/१२/२०२३ ते दि. १६/१२/२०२३ | दि.१८/१२/२०२३ ते दि. २३/१२/२०२३ |

## परीक्षा फी खालीलप्रमाणे

| अ. क्र. | वर्ग | परीक्षा फी | कॅप फी | गुणपत्रक फी | परीक्षा अर्ज फी | एकूण फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम.ए. /एम.कॉम. | ५६० | ९५ | ९५ | २५ | ७७५ |
| २ | एम.एस्सी. | ५६० | ९५ | ९५ | २५ | ७७५ |
| ३ | एम.एस्सी. (कॉम्प्यु.सायन्स) | १४८५ | १६० | १६० | ३५ | १८४० |
| ४ | एम.व्होक. | १४८५ | १६० | १६० | ३५ | १८४० |
| ५ | बि.लिब. | ७५० | ९५ | ९५ | २५ | ९६५ |
| ६ | एम.लिब. | ९३५ | ९५ | ९५ | २५ | ११५० |

- **निर्धारीत मुदतीनंतर ऑनलाईन परीक्षा अर्ज उपलब्ध असणार नाहीत. तसेच, ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज ऑनलाईन भरून परीक्षा फी ऑनलाईन भरलेली आहे, अशा विद्यार्थ्यांचीच परीक्षा घेतली जाईल, याची संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी

प्रबंधक

प्राचार्य

Tuljaram Chaturchand College, Baramati 413102, Pune

प्रत:
१) विद्यार्थी सूचनाफलक
२) सर्व उपप्राचार्य
३) सर्व विभागप्रमुख
४) सर्व अधिष्ठाता
५) लेखा विभाग
६) ग्रंथपाल
७) IQAC विभाग